रक्तातील साखर तपासताना चुका टाळा!

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : रक्तातील साखरेची पातळी वाढणे धोकादायक ठरू शकते. ही स्थिती विशेषतः मधुमेहाच्या रुग्णांसाठी आरोग्य समस्याही निर्माण करू शकते. त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांनी रक्तातील साखरेची पातळी वेळोवेळी तपासणे महत्त्वाचे आहे. परंतु तपासणीवेळी काही चुका टाळायला हव्यात, असा सल्ला आरोग्यतज्ज्ञ देतात.

सर्वात गंभीर चूक म्हणजे हात स्वच्छ न धुणे. एखाद्या फळाला स्पर्श केला असेल आणि हात न धुता चाचणी केली असेल तर 'प्रमाणाचे वाचन' वास्तविकतेपेक्षा अधिक असू शकते. त्यामुळे तपासणीपूर्वी हात स्वच्छ धुऊन पुसणे आवश्यक आहे. यासह साखरेचे प्रमाण तपासण्याची वेळही महत्त्वाची असते. वेळा बदलल्यास रक्तातील साखरेच्या प्रमाणाची योग्य माहिती मिळणार नाही. यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच वेळीच चाचणी करणे आवश्यक आहे. रिकाम्यापोटी रक्तातील साखरेची तपासणी उपवासानंतर ८ ते १० तासांनी करावी. तसेच जेवण झाल्यानंतर २ तासांनी चाचणी करायला हवी.

आधुनिक ग्लुकोमीटरद्वारे कधी कधी रुग्ण बोटावर दाब देऊन रक्त काढतात. त्यामुळेही प्रमाणात तफावत दिसू शकते. त्यामुळे चाचणीपट्टीला स्पर्श न करता तपासणी करायला हवी. यासह चाचणीपट्टी जर मुदतबाह्य असेल तर ती तात्काळ बदलायलाही हवी. ग्लुकोमीटर हे एक वैद्यकीय उपकरण असून ते स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. धूळ, घाण आणि आर्द्रता यामुळे त्याचे कार्य बिघडण्याची शक्यता असते.

डॉ. मानसी Tanvi HERBALS क्लिनिक
डॉ. पुष्कराज धामणकर
आजच अपॉइंटमेंट बुक करा
फ्री चेकअप कॅम्प
लठ्ठपणा ? पायाला सूज ?
चालताना दम लागतोय ?
9833683021

चंद्रभागा नदीच्या पुराचे हवाई दृश्य. (छाया - राहुल गोडसे, पंढरपूर)

पंढरपूरमध्ये चंद्रभागेला पूर

नदीकाठच्या नागरिकांचे स्थलांतर

लोकसत्ता वार्ताहर

पंढरपूर : उजनी आणि वीर धरणातून सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे भीमा अर्थात पंढरीतील चंद्रभागा नदीला पूर आला आहे.

पंढरपूरमध्ये चंद्रभागा नदीने इशारा पातळी ओलांडली असून वाळवंटातील सर्व मंदिरे पाण्याखाली गेली आहेत. तर नदीकाठच्या झोपडपट्टीत पाणी शिरल्याने ३५० नागरिकांना स्थलांतरित केले आहे. उजनी आणि वीर या दोन्ही धरणांतून मिळून पाणी सोडण्यात आल्यामुळे नदीला हा पूर आला आहे.

पंढरीतील पुराचे हे पाणी शहरातील काही भागांत जाण्याची शक्यता असून तेथील नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत, अशी माहिती पालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

उजनी धरणात पुणे जिल्ह्यातून विविध ठिकाणाहून पाणी मोठ्या प्रमाणत येत आहे. धरणातून भीमा नदीला १ लाख ५० हजार क्युसेक पाणी सोडण्यात आले आहे. नीरा आणि भीमा नद्यांमध्ये अन्य नद्यांचेही पाणी मिसळत असल्याने अकलूज येथील दोन्ही नद्यांच्या संगमानंतर या पाण्यामध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसत आहे. पुणे जिल्ह्यात पावसाने जरी उसंत घेतली असली तरी उजनी धरणात मोठ्या प्रमाणात पाणी येत आहे. वीर धरणातून पाण्याचा विसर्ग हळूहळू कमी करण्यात आला आहे. गुरुवारी सकाळी सात वाजता नीरा नदीत १५ हजार क्युसेक पाणी सोडण्यात आले आहे.

- अकलूजजवळून एकत्रित भीमा पात्रातून गुरुवारी सायंकाळी ५ वाजता १ लाख ९६ हजार क्युसेक इतके पाणी वाहत होते. तर येथील भीमा नदीची पाण्याची पातळी ४४४.४६ मी. होती.
- भीमा नदीची धोक्याची पातळी ४४५ मीटर इतकी आहे. सद्यःस्थिती पाहता भीमा नदीची धोक्याच्या पातळीकडे वाटचाल सुरू आहे.

देखण्या देवणी, लाल कंधारी गोवंशांची तीन लाखांवर वृद्धी

बिपीन देशपांडे, लोकसत्ता

छत्रपती संभाजीनगर : राज्यातील २१व्या पशुगणनेत एकूणच पशुधनाची संख्या अर्धा कोटीवर घटल्याची शक्यता वर्तवण्यात येत असतानाच 'इतिहास' जमा गणल्या गेलेल्या मराठवाडी देखण्या देवणी व लाल कंधारी या देशी गोवंशांच्या संख्येत मात्र, लक्षणीय वाढ झाली आहे. देवणी व लाल कंधारी गोवंशांची संख्या राज्यात मिळून २ लाख ९१ हजार ६२६ पर्यंत असून, गतवर्षात पार पडलेल्या २१ व्या पशुगणनेत ही संख्या ५० टक्क्यांनी वाढल्याचाही अंदाज आहे.

मराठवाड्यातील लातूर, नांदेड, धाराशिव व हिंगोली ही चार जिल्हे समाविष्ट असलेल्या लातूर पशुसंवर्धन आयुक्तालयांतर्गत देवणी व लाल कंधारी व त्या दोन्हीसम शुद्ध गोवंशाची संख्या अधिक दिसते आहे.

देशी गोवंश संवर्धन धोरणांतर्गत त्यांच्या वृद्धीसाठी ग्रामीण भागातील प्रत्येक पशुचिकित्सालयात शुद्ध वीर्य अत्यंत माफक दरात उपलब्ध करून देण्यात आले आहे. देवणी, लाल कंधारीसह खिल्लारी, गीर, साहिवाल व डांगी या देशी गोवंशांचे वीर्य उपलब्ध आहे. गोळव या गोवंशाचेही वीर्य उपलब्ध करून दिले जाते.
- डॉ. असरार अहमद, सहायक आयुक्त, पशुसंवर्धन

- लातूर विभागात शुद्ध लाल कंधारी २९ हजार ५१६ नर तर ६६ हजार ८९१ मादींच्या संख्येत आहेत. लाल कंधारीसारख्याच नर गोवंशांची संख्या १९ हजार ९२५ तर ४२ हजार २१७ मादी आहेत.
- शुद्ध देवणी गोवंशांची लातूर विभागातील चार जिल्ह्यांमध्ये मिळून ३१ हजार ३४ तर मादीमध्ये ८० हजार ६९संख्या आहे. देवणीसारख्याच गोवंशांची संख्या २ हजार १९५ तर ५ हजार ५८९ मादींची संख्या आहे.
- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात देवणी नर गोवंशांची संख्या ६ हजार ६२५ तर १४ हजार ४८२ मादी आहेत. देवणीसारख्या दिसणाऱ्या नरांची संख्या २ हजार २७८ तर ४ हजार ५३९ मादींची संख्या आहे.
- शुद्ध नर लाल कंधारींची संख्या १३ हजार ९९८ तर २६ हजार ७१० मादींची संख्या आहे. लाल कंधारीसारख्या नरांची संख्या ४ हजार ८४३ तर ८ हजार ६४८ मादींची संख्या आहे.

वायुगळतीमुळे चौघांचा मृत्यू

दोन गंभीर; तारापूर औद्योगिक वसाहतीतील घटना

लोकसत्ता प्रतिनिधी/ वार्ताहर

पालघर / बोईसर : पालघरमधील तारापूर औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यात वायुगळती झाल्यामुळे चार कामगारांचा मृत्यू झाला. ही वायुगळती प्लॉट नंबर एफ - १३मधील मेडली फार्मास्युटिकल्समध्ये झाली. या दुर्घटनेतील दोन कामगार गंभीर असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

कल्पेश राऊत, बंगाली ठाकूर, धीरज प्रजापती, कमलेश यादव अशी मृतक कामगारांची तर रोहन शिंदे, निलेश हाडळ अशी गंभीर असलेल्या कामगारांची नावे आहेत.

कारखान्यात दुपारी २.३० वाजताच्या सुमारास सुमारास 'एलबेंडोझोल'चे उत्पादन सुरू असतानाच प्रक्रिया होणाऱ्या टाकीच्या परिसरात नायट्रोजन वायूची गळती झाली. ज्या ठिकाणी ही गळती झाली त्या ठिकाणी कार्यरत असलेले सर्व कामगार बाधित झाले. दरम्यान, वायुगळती होताच प्राणवायूची मात्रा कमी झाल्याने चार कामगारांचा मृत्यू झाला तर दोघांची प्रकृती चिंताजनक आहे.

बेशुद्धावस्थेत या कामगारांना बोईसर येथील शिंदे रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र चौघांचा मृत्यू झाल्याचे डॉ. स्वप्नील शिंदे यांनी 'लोकसत्ता'ला सांगितले. उपचार घेणाऱ्या रुग्णांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले.

पंचतारांकित हॉटेलमध्ये बॉम्बस्फोटाची धमकी

मुंबई : वरळी येथील पंचतारांकित हॉटेलला बॉम्बस्फोटाच्या धमकीबाबत ई-मेल प्राप्त झाला. वरळीतील फोर सिझन हॉटेलला हा धमकीचा ई-मेल आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

माहिती मिळाल्यानंतर मुंबई पोलिसांनी सर्वत्र तपासणी केली. आरडीएक्स व आईडीद्वारे बॉम्बस्फोट घडवण्यात येणार आहेत. त्यासाठी तीन व्हीआयपी खोल्या व इतर पाहुण्यांना बाहेर काढा, असे या ई-मेलमध्ये नमूद होते. तसेच तामिळनाडू पोलिसांना युनियन स्थापन करण्याची मागणी या ई-मेलमध्ये करण्यात आली होती.

SOMAIYA VIDYAVIHAR — K J Somaiya Institute of Technology — Somaiya TRUST

K J SOMAIYA INSTITUTE OF TECHNOLOGY
(Formerly known as K J Somaiya Institute of Engineering and Information Technology)
An Autonomous Institute Permanently Affiliated to University of Mumbai.
Accredited by NAAC (A)
Somaiya Ayurvihar Complex, Eastern Express Highway, Sion, Mumbai-400022.
Tel: 022-44444444, 022-44444408
Email: principal.tech@somaiya.edu • Web: https://kjsit.somaiya.edu.in/en
DTE Code: EN3209, Gujarati Linguistic Minority

F. Y. (B. TECH.) & M. TECH. (AI) ADMISSION NOTICE 2025-2026

K J. Somaiya Institute Technology (KJSIT) invites online applications for admissions to First Year (B Tech and M, Tech. (Artificial Intelligence) for **Vacancies against CAP & CAP-MI** seats, if any, after all CAP rounds. Please visit our Institute website https://kjsit.somaiya edu.in/en **for more details.**

Pre-admission form online submission & payment of Processing Fees of Rs. 1000/-	End Date
B. Tech. (First Year Engineering)	03-09-2025
M. Tech. (Artificial Intelligence)	31-08-2025

Sd/-
Principal

pnb Housing Finance Limited

नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, अंत्रिक्ष भवन, २२, के.जी. मार्ग, नवी दिल्ली-११०००१.
फोन्स : ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट : www.pnbhousing.com

शाखा कार्यालय नाशिक : ४०७ व ४०८, ४था मजला, पद्म विश्व लँडमार्क, तनिष्क शोरूमजवळ, ॲक्सिस बँकेच्या वरती, राका कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक-४२२००२.

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी, "पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायजेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्सअंतर्गत आणि एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२च्या रुल ८(१) च्या अनुपालनार्थ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सुचनांच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत प्रत्येक अकाऊंटच्या अनुसार नमूद केल्यानुसार रकमेची परतफेड करण्याकरिता संबंधित ऋणकोंवर फर्मांविणारी प्रत्येक अकाऊंटच्या अनुसार नमूद केलेल्या तारखेदिवशी मागणी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, ऋणकोंना आणि आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी प्रत्येक अकाऊंटच्या अनुसार नमूद केलेल्या तारखांदिवशी उक्त रुल्सच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत त्यांना/तिला प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

विशेषकरून ऋणकोंना तसेच आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी उक्त मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि उक्त मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार कर्ज करारानाम्याच्या अनुसार रकमेस व त्यावरील व्याज या रकमेकरिता "पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"च्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे. सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध पेठेत विमोचनाकरिता ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८)च्या तरतुदींकडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत.

लोन अकाऊंट नं.	ऋणको/सह-ऋणको/ हमीदाराचे नाव	मागणी सूचना तारीख	थकीत रक्कम	ताबा घेतल्याची तारीख	गहाणवट मालमत्तेचे वर्णन
HOU/NSK/ 0821/904469 शाखा कार्यालय : नाशिक	दिपक राजू अहिरे / अल्का दिपक अहिरे	०७.०२.२०२४	रु. १४,३४,२८५.२९/- (रुपये चौदा लाख चौतीस हजार दोनशे पंचाऐंशी व पैसे एकोणतीस फक्त)	१९.०८.२५ प्रत्यक्ष ताबा	सिंगल बिल्डिंग, तिसरा मजला, फ्लॅट नं. १६, "सनशाईन अपार्टमेंट", प्लॉट नं. १५ व १६, सर्व्हे नं. १२३ / ए / २, सीटीएस नं. ४१४६ व ४१४५, सातपूर गंगापूर रोड, भोर टॉवर जवळ, शिवाजी नगर, जिलेब गंगापूर शिवार, नाशिक-४२२००७, महाराष्ट्र, भारत.

स्थळ : नाशिक — दिनांक : २२.०८.२०२५ — प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि.

केनरा बैंक Canara Bank — सिंडिकेट Syndicate

ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा, पुणे : १२५९, रेणुका कॉम्प्लेक्स, १ ला मजला, जंगली महाराज रोड, डेक्कन जिमखाना, पुणे-४११००४ ईमेल : cb5208@canarabank.com
फोन : +९१ २० २५५११०३४, ९७९८०३२०११

विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि त्यासह वाचण्याच्या सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ मधील रुल ८ (६) च्या अटींनुसार स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता ई-ऑक्शन विक्री सूचना

या ठिकाणी सर्वसाधारण जनतेस आणि कर्जदार व जामीनदार यांना विशेषकरुन सूचना देण्यात येते की पुढे नमूद केलेल्या स्थावर मालमत्ता ज्या सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण/बोज्याअंतर्गत असून कॅनरा बँक एआरएम शाखा, पुणे यांचे अधिकृत अधिकारी यांनी या मालमत्तेचा **प्रतिकात्मक ताबा** घेतला आहे, या संदर्भात **१) मे. शंकरराव उत्तमराव पाटील (कर्जदार/प्रोप्रायटर/जामीनदार)** दुकान नं. २१, श्री. गणेश पार्क अपार्टमेंट निलेश इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., भाभा नगर, नाशिक ४२२०११ **आणि तसेच :** फ्लॅटनं. १०, श्री गणेश पार्क अपार्टमेंट, गायकवाड हॉलजवळ, भाभा नगर, नाशिक ४२२०११, **२) श्री. विलास एस पाटील (जामीनदार), ३) श्री. नीलेश एस पाटील (जामीनदार) ४) श्रीमती निर्मलाबाई एस. पाटील (जामीनदार) २, ३, आणि ४ राहणार :** फ्लॅट नं.१० श्री गणेश पार्क अपार्टमेंट गायकवाड हॉलजवळ, भाभा नगर नाशिक ४२२०११, **५) श्री. प्रविण विठ्ठल पाटील,** मु. ३८, सरस्वती नगर, नंदुरबार ४२५४१२ यांच्याकडून ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा, कॅनरा बँक, १ ला मजला, १२५९, रेणुका कॉम्प्लेक्स, जंगली महाराज रोड, डेक्कन जिमखाना, पुणे-४११००४ यांना येणे असलेली रक्कम **रु. ४,२८,९१,९४३.११ (रु. चार कोटी अठ्ठावीस लाख एक्क्याण्णव हजार नऊशे त्रेचाळीस आणि पैसे अकरा फक्त) दि. १८/०८/२०२५ रोजी** अधिक त्यावरील व्याज आणि आकार इ. वसुल करण्याकरिता सदर मालमत्तांची विक्री **''जसे आहे, जेथे आहे''** आणि **''जसे आहे, जे आहे''** आणि **''तेथे जे आहे''** या तत्त्वावर **दि. १५/०९/२०२५** रोजी करण्यात येणार आहे.

राखीव किंमत, बयाणा आणि बयाणा भरण्याची शेवटची तारीख, स्थावर/जंगम मालमत्ता यांचा पूर्ण तपशील खालीलप्रमाणे

मालमत्तेचा तपशील आणि स्थळ	राखीव किंमत	बयाणा आणि बयाणा सादर करण्याची अंतिम तारीख	माहीत असलेला बोजा
लॉट २ : स्टोन क्रशरच्या सर्वसामाईक भागाचे समतुल्य गहाणखत, गट नं. ८४/२ व गट नं. ८७/१, धीरजगांव, फुलसारा रोड, ऑफ नंदुरबार सूरज रोड, धीरजगांव, ता. व जिल्हा नंदुरबार-४१३००६ येथे, क्षेत्रफळ ५६,५०० चौ. मी.	रु. २,७१,२०,०००/-	रु. २७,१२,०००/- (रुपये सत्तावीस लाख बारा हजार फक्त) दि. १४/०९/२०२५ रोजी, सायं. ५.०० पर्यंत	बँकेला माहित नाही
लॉट ३ : रिक्त प्लॉट नं. १ व २ च्या सर्वसामाईक भागाचे समतुल्य गहाणखत, स. नं. २९८/२ डी, भाग शिवार नंदुरबार, अस्ट्राईड नंदुरबार, धुळे रोड, ता व जिल्हा नंदुरबार, अनुक्रमे क्षेत्रफळ १०९० चौ. मी. व ४६० चौ. मी., विलास एस. पाटील यांच्या नावावर. क्षेत्रफळ १,५५० चौ. मी.	रु. १,०३,८५,०००/-	रु. १०,३८,५००/- (रुपये दहा लाख अडतीस हजार पाचशे फक्त) दि. १४/०९/२०२५ रोजी, सायं. ५.०० पर्यंत	बँकेला माहित नाही

विक्रीच्या सविस्तर अटी आणि शर्तीकरिता कृपया कॅनरा बँकची वेबसाईट म्हणजे **(www.canarabank.com, https://baanknet.com)** यावर उपलब्ध करुन देण्यात आलेली "ई-ऑक्शन" लिंक पहावी किंवा मुख्य प्रबंधक, कॅनरा बँक, ए आर एम शाखा, १२५९, डेक्कन जिमखाना, रेणुका कॉम्प्लेक्स, १ला मजला, जंगली महाराज रोड, पुणे-४११००४, फोन : **०२०२५५११०३४, ८७३९०१८७७८ व ७५०९९८५७०५** यांच्याशी संपर्क साधावा.

दिनांक : २०/०८/२०२५
स्थळ : पुणे
(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)
अधिकृत अधिकारी, कॅनरा बँक

TATA

टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत पत्ता : ११ वा मजला, टॉवर 'ए', पेनिनसुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई - ४०० ०१३.
शाखेचा पत्ता : ऑफिस नं. ४१, ४था मजला, बिझनेस बे, कुटे मार्ग, तिडके कॉलनी, नाशिक-४२२००२, महाराष्ट्र.

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता सूचना

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८(६) अंतर्गत)
सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२च्या रुल ८(६) व रुल ९(१) यासह वाचलेल्या सिक्युरिटायजेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ३० दिवसीय ई-लिलाव सूचना.

आम जनतेस आणि विशेषकरून याखालील नमूद केलेल्या ऋणको / सह-ऋणको किंवा विशेषकरून त्यांचे विधि वारसदार / प्रतिनिधी (ऋणको) यांना याद्वारा सूचना देण्यात येते की, "टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि."कडे ("टीसीएचएफएल") गहाण असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा "टीसीएचएफएल"च्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आलेला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली नमूद केलेल्या ऋणको व सह-ऋणकोंकडील थकीत देणींच्या वसुलीकरिता **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे" व "जे काही आहे तेथे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय"** या तत्त्वावर **२३.०९.२०२५** रोजी करण्यात येणार आहे. राखीव किंमत व इसारा रक्कम ठेव खाली नमूद केली आहे. याद्वारा सूचना देण्यात येते की, विक्रीची तारीख पुढे ढकलणे/विक्री खंडित होणे न झाल्यास, उक्त सुरक्षित मत्ता/मालमत्तेची विक्री उक्त **२३.०९.२०२५** रोजी **दु. ०२.०० वा.** ई-लिलावाद्वारा करण्यात येणार आहे. ई-लिलावात सहभागी होण्याकरिता इरठेचा डिमांड ड्राफ्ट समाविष्ट. मोहोरबंद लिफाफा, शाखेचा पत्ता **"टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड" ऑफिस नं. ४१, ४था मजला, बिझनेस बे, कुटे मार्ग, तिडके कॉलनी, नाशिक-४२२००२, महाराष्ट्र** येथे **२२.०९.२०२५** रोजी **सायं. ०५.०० वा. पर्यंत किंवा तत्पूर्वी** "टीसीएचएफएल"च्या प्राधिकृत अधिकारीकडे सादर करण्यात यावा.

सुरक्षित मत्ता/स्थावर मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या संक्षिप्त तपशीलवार वर्णनानुसार "जसे आहे जेथे ज्या स्थितीत आहे" या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

अ. क्र.	लोन अका. नं.	ऋणको/सह-ऋणको/ विधि वारसदार/विधि प्रतिनिधी/ हमीदारांची नावे	मागणी सूचनेची तारीख	राखीव किंमत	थकीत रक्कम
१	9473069	श्री. प्रशांत शंकर पाटील श्री. दिपक शंकर पाटील श्रीमती मीना शंकर पाटील	रु. १४,०९,३४६/- (रुपये चौदा लाख नऊ हजार तीनशे शेहेचाळीस फक्त) ११.१२.२०१८	रु. १९,२१,५००/- इसारा रक्कम ठेव (इरठे) : रु. १,९२,१५०/- ताब्याचा प्रकार : प्रत्यक्ष	रु. ३१,८३,९३९/- (रुपये एकतीस लाख त्र्याऐंशी हजार नऊशे एकोणचाळीस फक्त) १२.०८.२०२५

स्थावर मालमत्तेचे वर्णन : पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - प्लॉट नं. ४३, ४४, ६७ व ६८, त्यावरील फ्लॅट नं. ए-१२, मोजमापाचा एरिआ ५८.५५ चौ.मी., तिसऱ्या मजल्यावरील, "श्री निवास रेसिडंसी"च्या विंग "ए" मधील, म्हसरूल, नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशन, नाशिकच्या मर्यादेत.

लिलावाच्या स्थळी आम जनतेस त्यांच्या बोली व्यक्तीशः सादर करण्यास आमंत्रित करण्यात आले आहे. कोणताही अधिकारी किंवा कोणतीही व्यक्ती, या विक्रीसंबंधित बोलीकरिता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणतीही भुमिका बजावत असल्यास विक्री, तथापि, विकलेल्या मालमत्तेवरील कोणतेही हित संपादन करणे किंवा करण्याचा प्रयत्न करणार नाही.

विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ यामधील विहित आणि पुढील शर्तींच्या अनुसरणाच्या विषयाधीन राहील :

नोंद : मालमत्तेच्या ई-लिलावाचे आयोजन प्रत्येकी ५ मिनिटांच्या मर्यादित विस्तारासह २३.०९.२०२५ रोजी दु.०२.०० व दु.०३.०० दरम्यान http://bankauctions.in/ या पोर्टलद्वारा करण्यात येईल.

शर्ती व अटी :

१. याखालील अनुसूचीतील विनिर्दिष्ट तपशील निम्नस्वाक्षरीकारांच्या उत्तम माहितीच्या आधारे दिलेला आहे, परंतु निम्नस्वाक्षरीकार या उद्घोषणेतील कोणतीही चूक, असत्कथन किंवा लोपन याकरिता उत्तरदायी नसतील. बोली रक्कम किंवा बोलीदारासंबंधित कोणताही वाद उद्भवल्यास स्थावर मालमत्ता पुन्हा एकदा प्राधिकृत अधिकारींच्या स्वेच्छाधिकाराच्या विषयाधीन लिलावात ठेवण्यात येईल. २. स्थावर मालमत्ता राखीव किमतीच्या खाली विकली जाणार नाही. ३. बोली वृद्धी रक्कम **रु. १०,०००/-** (रुपये दहा हजार फक्त) असणार आहे. ४. मालमत्तेच्या खरेदीकरिता सादर केलेल्या सर्व बोली **"टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि."**च्या नावे, देय शाखेच्या पत्त्यावर, डिमांड ड्राफ्टद्वारा वर नमूद केल्यानुसार इसारा रकमेसमवेत असतील. डिमांड ड्राफ्ट्स लिलावानंतर अयशस्वी बोलीदारास परत केले जातील. एनईएफटी/आरटीजीएस/आयएमपीएसद्वारा इरठेच्या प्रदानाकरिता, कृपया प्राधिकृत अधिकारींशी संपर्क साधावा. ५. उच्चतर बोलीदारास यशस्वी बोलीदार म्हणून घोषित करण्यात येईल, मात्र असे की तो / ती बोलीकरिता कायद्याने अर्हताप्राप्त असावा / असावी आणि अधिक बोली रक्कम राखीव किमतीच्या कमी नसावी. उच्चतर बोलीची स्वीकृती किंवा नापसंती "प्राधिकृत अधिकारी"च्या स्वेच्छाधिकारावर राहील, जेव्हा दिलेली किंमत स्पष्टपणे त्यांना अपुरी वाटल्यास त्यांना तसे करणे भाग पडल्यास. ६. अभिलिखित कारणे देऊन विक्री स्थगित करण्याचा/खंडित करण्याचा स्वेच्छाधिकार "प्राधिकृत अधिकारी"चा राहील. ७. स्थावर मालमत्तेची पाहणी **१२.०९.२०२५ रोजी स. ११.०० व सायं. ०५.०० वा. दरम्यान** भेटीची पूर्व-वेळ ठरवून करता येईल. ८. यशस्वी बोलीदार म्हणून घोषित झालेली व्यक्ती, सदर घोषणेनंतर त्वरित, खरेदी रक्कम / बोली रकमेच्या पंचवीस टक्के ठेव जमा करील, ज्यामध्ये २४ तासांच्या आत "प्राधिकृत अधिकारी"कडे जमा करावयाची इरठे रक्कम समाविष्ट असेल आणि सदर ठेव जमा करण्यास कसूर झाल्यास मालमत्ता पुढे खासगीरीत्या नवीन लिलाव/विक्रीकरिता ठेवण्यात येईल. ९. जर वरीलनुसार प्रारंभिक ठेव जमा केल्यास, देय खरेदी रकमेची उर्वरित रक्कम मालमत्तेच्या विक्रीच्या निश्चित तारखेपासून १५ व्या दिवशी किंवा तत्पूर्वी, सदर दिवस वगळता किंवा १५ वा दिवस रविवार किंवा अन्य सुटीचा दिवस असल्यास १५ व्या दिवसानंतर येणाऱ्या पहिल्या कार्यालयीन दिवशी "प्राधिकृत अधिकारी"कडे खरीददाराद्वारा प्रदान करावयाची आहे. १०. वर नमूद केलेल्या कालावधीच्या आत कोणत्याही प्रदानास कसूर झाल्यास मालमत्ता खासगीरीत्या नवीन लिलाव/विक्रीकरिता ठेवण्यात येईल. इरठेसमाविष्ट ठेव **"टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि."**द्वारा जप्त करण्यात येईल आणि कसूर करणारा खरीददार मालमत्तेवरील सर्व दावे गमावेल. ११. कोणत्याही भाराचा सविस्तर तपशील, **"टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि."**ला ज्ञात असलेला, ज्याकरिता मालमत्ता पात्र आहे : वरील तक्त्यानुसार. स्वारस्य असलेल्या बोलीदारांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी मालमत्ता करावरील सांविधिक थकीत दायित्वे, विद्युत देय, इ. समाविष्ट मालमत्तेवरील भारासंबंधित स्वतः स्वतंत्र चौकशी करावी. **१२. कोणत्याही अन्य तपशिलाकरिता किंवा ई-लिलावावरील ऑनलाइन प्रशिक्षण प्रक्रिया याकरिता भावी बोलीदार सेवा-पुरवठाकार "मेसर्स ४क्लोजर", ब्लॉक नं. ६०५ ए, ६ वा मजला, मैत्रिवणम कमर्शियल कॉम्प्लेक्स, अमीरपेट, हैदराबाद-५०००३८, ईमेल : info@bankauctions.in किंवा मनिष बंसल, ईमेल : Manish.Bansal@tatacapital.com प्राधिकृत अधिकारी, मोबाईल नं. ८५८८९८३६९६ यावरून संपर्क साधू शकतील. कृपया तुमच्या शंका वॉट्सॲप नंबर - ९९९९०७८६६९ यावर पाठवाव्यात.** १३. उच्चतर घोषित केलेल्या बोली रकमेवरील उच्चतर बोलीदाराद्वारा १% ची टीडीएस लागू व देय असणार आहे. रक्कम मालक / ऋणकोच्या पॅनमध्ये उच्चतर बोलीदाराद्वारा भरणे आवश्यक असणार आहे आणि चलनाची प्रत आमच्या कंपनीकडे सादर करावयाची आहे. १४. कृपया वरील तपशिलाकरिता **https://surl.li/xggged** या सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी. १५. कृपया या लिंकवरसुद्धा भेट द्यावी : **https://www.tatacapital.com/property-disposal.html**